MHBU150008132020

**नियमीत दिवाणी दावा नं. ८२/२०२० मधील**
**निशाणी–१५, १६ व १७ वरील एकत्रित आदेश**

सदरचे अर्ज अर्जदाराने **वादी – किसन शंकर गायके** हे मयत झाल्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी, दावा अबेट झाल्याचा आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी व वादी यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेले आहेत.

२. अर्जदार यांचे कथन की, दाव्याचे कामकाज चालु असतांना **वादी – किसन शंकर गायके** हे **दि. ११/०१/२०२४** रोजी मयत झालेले आहे. अर्जदाराच्या वकीलांनी युक्तिवादादरम्यान सांगितले की, अर्जदारांना कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे वादीचे वारस अभिलेखावर घेण्यास सुमारे १ वर्ष १ महिने १७ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ होऊन वादी यांचे वारस म्हणुन अर्जदारांना अभिलेखावर घेण्याची विनंती केली. अर्जदाराच्या कथनाच्या पृष्ठार्थ प्रतिज्ञापत्रे दाखल केली आहेत.

३. प्रतिवादीच्या विधीज्ञांनी त्यांचे म्हणणे दाखल केले अर्जास तिव्र विरोध दर्शविलेला आहे.

४. अर्जदाराने सदरचे अर्ज ९० दिवसांच्या आत दाखल न झाल्याने वादी यांच्या विरुध्द दावा अबेट झालेला आहे. सदर दावा मालकी हक्क जाहीर होऊन ताबा मिळणेसाठी आहे. अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक आहे. तसेच सदरील दाव्याचे स्वरुप पाहता व दावा पुर्ण गुणदोषावर निर्णयीत करण्यासाठी सदरील दाव्यामध्ये मयत **वादी – किसन शंकर गायके** यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे, परंतु अर्ज करण्यास झालेल्या विलंबामुळे प्रतिवादी यांचे झालेले नुकसान देखील नजरअंदाज करुन चालणार नाही. त्यामुळे, सदरील अर्ज हे योग्य खर्च लावुन मंजुर करणे न्यायाचे ठरले. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

(१) अर्ज रक्कम **रु. ३००/–** च्या खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

(२) खर्चाची रक्कम अर्जदाराने प्रतिवादी यांना पुढील तारखेपर्यंत दिल्यानंतर दाव्यात दुरुस्ती करुन **वादी – किसन शंकर गायके** यांचे वारस अभिलेखावर घ्यावेत.

स्वा/–

दिनांक : ०५/०५/२०२६.

**(श्री. हसीम मो. बेग)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
देऊळगांव राजा.

**प्रमाणपत्र**

वरील पी.डी.एफ फाईल मधील आदेश मुळ आदेशाप्रमाणे तंतोतंत बरोबर आहे.

०१. कनिष्ठ लिपीकाचे नावः- के.ए. बोरोकार (कनिष्ठ लिपीक)

०२. न्यायालयाचे नावः- सह दिवाणी न्यायालय क.स्तर, देऊळगांव राजा.

०३. अपलोड दिनांकः- ०५/०५/२०२६